# महाराष्ट्र शासन

जा.क्र.संअसे-२०११/लाअ/प्र.क्र.२/७११

दूरध्वनी क्र. २६६७ ०४३९
फॅक्स क्र. २६६६ ०२८७

संकेतस्थळ www.maharashtrafireservices.org

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**
राज्य अग्निशमन अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रुझ (पुर्व), मुंबई ४०० ०९८.
दिनांक : २२ जुलै, २०११.

विषय :महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ अंतर्गत राज्यात आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या प्रयोजनार्थ लायसन्सप्राप्त अभिकरण म्हणून काम करण्याकरिता लायसन्स देणेबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र जा.क्र.संअसे-२०११/लाअ/प्र.क्र.१, दिनांक १२.०५.२०११.

## का र्या ल यी न  आ दे श

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम ९(५) व कलम १९ (चार) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करुन संचालक, महाराष्ट्र अग्निशम सेवा यांनी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ च्या नियम १२ व १३ च्या अटींची पुर्तता करणाऱ्या ४० अभिकरणांना (आदेशासोबतचे परिशिष्ट "अ" नुसार) दिनांक १२.०५.२०११ ते ११.०५.२०१२ कालावधीकरीता लायसन्स मंजुर करण्यात आले आहे. या आदेशात स्पष्ट केल्याप्रमाणे आणखी काही अभिकरणांना लायसन्सप्राप्त अभिकरण मंजुरी देण्याची प्रक्रीया प्रगतीपथावर असून येत्या काही दिवसातच हे आदेश निर्गमित केले जातील.

०२. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ च्या नियम १३ (३) (क) खालील तक्त्यातील रकाना १ मध्ये स्थानिक प्राधिकरणे किंवा नियोजन प्राधिकरणे यांचा वर्ग नमुद करुन त्याखाली अ, ब, क व ड अशी वर्गवारी दर्शविली असून रकाना ४, ५ व ६ मध्ये मागील ३ वर्षात केलेल्या किमान कामाचा वार्षिक खर्च (रु.लाखात) उलाढाल दर्शविली आहे.

वास्तविक पाहाता कोणत्याही नागरी क्षेत्रात तसेच बृहन्मुंबई ज्याचे वर्गीकरण केले नाही अशा महानगरपालिका आणि विशेष नियोजन प्राधिकरण ज्याची वर्गवारी ड मध्ये होते, अशा ठिकाणी देखील या रकान्यात दर्शविलेल्या रकमेपेक्षा जास्त अथवा कमी रकमेची अग्निशमन यंत्रणा बसविण्याची कामे होत असतात. परिणामी स्थानिक प्राधिकरणे किंवा नियोजन प्राधिकरण यांची वर्गवीरी ही अनवधानाने झाली असल्याने केवळ लायसन्सची वर्गवारी वार्षिक उलाढालीप्रमाणे असणे व्यवहार्य ठरते. ही बाब लक्षात घेऊनच या संचालनालयाने दिनांक १२ मे, २०११ च्या कार्यालयीन आदेशात प्राधिकरण / नियोजन प्राधिकरण असा शब्दप्रयोग न करता १) हायड्रंट, स्प्रिंकलर्स, पंपींग, २) डिटेक्शन व फायर सप्रेशन (फायर सेपरेशन हा चुकीचा शब्द आहे) ३) पॅसिव प्रोटेक्शनची यंत्रणा बसविण्याचे अ / ब / क / ड वर्ग लायसन्स एजन्सीचे प्रमाणपत्र दिले आहे. याबाबत नियमात दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव देखील शासनास सादर करण्यात आला आहे.

०३. वरीलप्रमाणे केलेली कार्यवाही ही महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ ची राज्याच्या नागरी भागात व विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठीच केली आहे. तथापि, काही महानगरपालिका / नगरपरिषदांच्या क्षेत्रात या संचालनालयाने दिनांक १२.०५.२०११ च्या कार्यालयीन आदेशान्वये मंजुरी दिलेल्या लायसन्स प्राप्त एजन्सींना प्राधिकरणाच्या वर्गानुसार ते पात्र ठरत नसल्यामुळे अग्निशमन यंत्रणा बसविण्याची कामे करण्यापासून मज्जाव / प्रतिबंध / अडचणी निर्माण होत असल्याचे या संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे. वास्तविक पाहाता राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदांनी लायसन्सींग एजन्सी नेमण्यासाठी पुरेसे प्रयत्न न केल्याने अथवा कदाचित त्यांना पुरेशा प्रमाणात अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे म्हणा संचालनालयास पुढाकार घेऊन (प्रो ॲक्टीव्ह लीड) सदर अधिनियमाच्या कलम ९ व १९ चा वापर करणे भाग पडले आहे.

०४. सबब, वरील वस्तुस्थिती लक्षात घेता व संदर्भाधीन दिनांक १२ मे, २०११ च्या कार्यालयीन आदेशाच्या परिच्छेद ७ मध्ये निदेशित केल्यानुसार (डायरेक्टीव्ह) नुसार सर्व महारानगरपालिका / नगर परिषदा / नगर पंयायती व विशेष नियोजन प्राधिकरणांना पुन्हा निदेशित करण्यात येत आहे की, या संचालनालयाने मंजुरी दिलेल्या ४० लायसन्स एजन्सी आणि यापुढेही मंजुरी दिल्या जाणाऱ्या लायसन्सप्राप्त एजन्सींना देखील आपणातर्फे मंजुरी दिलेल्या लायसन्स एजन्सी समवेत आपल्या क्षेत्रात त्यांच्या वार्षिक उलाढालीच्या वर्गाच्या विहीत मर्यादेपर्यंतची अग्निशमन यंत्रणा १) हायड्रंट, स्प्रिंकलर्स, पंपींग, २) डिटेक्शन व फायर सप्रेशन ३) पॅसिव प्रोटेक्शनची यंत्रणा बसविण्याची कामे करण्यास प्रोत्साहन द्यावे. जेणेकरुन महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ ची राज्याच्या नागरी भागात व विशेष नियोजन भागात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे उद्दीष्ट आम्हा सर्वास साध्य करता येईल.

कृपया कार्यालयीन आदेश प्राप्त झाल्याची पोच द्यावी.

( एम. व्ही. देशमुख)
संचालक,
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

सहपत्र : परिशिष्ट - अ

प्रत :

१) मा. प्रधान सचिव-१, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२) मा. प्रधान सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३) मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पुर्व), मुंबई ४०० ०९३.
५) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, नवी मुंबई ४०० ६१४.
६) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण, वांद्रे (पुर्व), मुंबई ५१.
७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग, प्रकाशगड, बांद्रा, (पुर्व), मुंबई ५१.

८) मा. आयुक्त, सर्व महानगरपालिका,
९) मा. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई ४०० ०३०.
१०) मा. संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) सर्व जिल्हाधिकारी.
१२) मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.
१३) मुख्य अग्निशमन अधिकारी, सिडको, नवी मुंबई ४०० ६१४.
१४) मुख्य अग्निशमन अधिकारी, सर्व महानगरपालिका.
१५) मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदां.
१६) अग्निशमन अधिकारी, सर्व नगर परिषदां.
१७) परिशिष्ट-अ मधील सर्व लायसन्स अभिकरणे.
१८) नगर विकास विभागातील सर्व अधिकारी.
१९) निवड नस्ती (म.अ.से. संचालनालय).